मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क.B(Gen)- 1001/2023/632 दिनांक ०१/०४/२०२३ अन्वये गौण प्रकरणे (Petty Cases) निकाली काढण्याचे विशेष मोहीमेअंतर्गत (Special Drive)

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,(न्यायालय क्र.३) यवतमाळ यांचे न्यायालय**

(पिठासिन अधिकारी बी. एस. संकपाळ)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २४८२/२०२३** **निशाणी क्र.०२**

**गुन्हयाचा तपशिल**

१.अपराध घडल्याचा दिनांक वाजता : २७.०४.२०२३

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक : २७.०४.२०२३

३. फिर्यादीचे संपुर्ण नाव व पत्ता : महाराष्ट्र सरकार मार्फत -
पोलीस निरीक्षक,
यवतमाळ शहर पो.स्टे.,
ता. जि. यवतमाळ.

४. आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता : प्रभाकर गंगाराम ठाकरे
वय ५२ वर्षे धंदा मजूरी
**रा. वंजारी फैल, यवतमाळ**

५. गुन्हयाचे विवरण :-

दिनांक २७.०४.२०२३ रोजी स्टेट बॅंक चौक, यवतमाळ याठिकाणी तुम्ही लोकांकडून पैसे घेवून त्यांना वरली मटका जुगार खेळवितांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) नुसार दंडनिय गुन्हा केला असून त्याची मी दखल घेतलेली आहे.

वरील गुन्हयाच्या विवरणाप्रमाणे या न्यायालयाव्दारे तुमच्या विरुध्द प्रकरण पुढे चालविण्यात येईल असे मी निर्देशीत करतो.

माझे समक्ष

दिनांक :०९.१२.२०२३.

(बी. एस. संकपाळ)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,यवतमाळ.
(न्यायालय क्र.३)

६. आरोपीची विनंती/म्हणणे खालीलप्रमाणे :

प्रश्न १. तुम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय ?
उत्तर :- होय.

प्रश्न २. तुम्हाला गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगीतला तो तुम्हाला

समजला काय ?
उत्तर :- होय.

प्रश्न ३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :- होय. मला गुन्हा कबुल आहे.

____________

(आरोपीची सही) माझे समक्ष

दिनांक :०९.१२.२०२३

(बी. एस. संकपाळ)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, यवतमाळ.

## न्यायनिर्णय

आरोपीने स्वेच्छेने त्याचेविरुध्द असलेला गुन्हा न्यायालयासमक्ष मान्य केला. आरोपीने कथन केले की, त्याचे कुटुंब पूर्णपणे त्याच्यावर अवलंबुन आहे व हा त्याचा पहिला गुन्हा असून यापुढे तो भविष्यात कोणत्याही प्रकरचा गुन्हा करणार नाही त्यामुळे त्याने कमी शिक्षा करण्याची विनंती केली. आरोपीने केलेल्या गुन्हयास तिन महीन्यापर्यंतची कारावासाची शिक्षा किंवा तिनशे रुपयांपर्यंत द्रव्यदंड अथवा दोन्ही शिक्षा अशा स्वरुपाची शिक्षा कायदयात नमुद करण्यात आली आहे. आरोपीने कबुल केलेल्या गुन्हयाचे, त्याबाबत असलेल्या शिक्षेचे, आरोपीने शिक्षेबाबत केलेल्या कथनांचा विचार करता आरोपीस कायदयात नमुद केलेला जास्तीत जास्त द्रव्यदंड व न्यायालय उठेपर्यंतची शिक्षा दिल्यास कायदयाचा हेतू साध्य होवू शकतो. त्यामुळे वरील सर्व परिस्थींचा विचार करता न्यायाचा हेतू साध्य करण्यासाठी मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१) आरोपी प्रभाकर गंगाराम राठोड फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५२ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) अनुसार दोषी धरण्यात येते.

२) आरोपीला न्यायालय उठेपर्यंतच्या साध्या कारावासाची शिक्षा व रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तिनशे फक्त) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा व द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास ०१ (एक) दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

३) गुन्हयातील जप्त मुद्देमाल वरली मटका साहीत्य आव्हान याचीकेचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे तसेच गुन्हयातील जप्त रोख रक्कम रु. १४०/- (अक्षरी रुपये पाचशे साठ फक्त) कोणीही मागणी न केल्यामुळे आव्हान याचीकेचा कालावधी संपल्यानंतर शासन जमा करण्यात यावी.

४)		सदर आदेशाची प्रत आरोपीस त्वरीत विनामुल्य देण्यात यावी.

दिनांक :०९.१२.२०२३

(बी. एस. संकपाळ)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,यवतमाळ.
(न्यायालय क्र.३).